## प्रकरण पहिले

### - मराठी कादंबरीचे स्वरुप आणि विकास -

## प्रकरण पहिले

## मराठी कादंबरीचे स्वरूप आणि विकास

### × कादंबरी स्वरूप - एक रूपरेषा ×

आपण ज्या समाजात राहतो तो समाज खूप प्रवाही आहे. सतत बदलणारा आहे. त्यामुळेच कालमानाप्रमाणे त्याच्या रूप-स्वरूपात निश्चित दिसून येणारे काही बदल आढळतात. सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेत समाजाशी संबंधित अनेक सामाजिक प्रश्न नेहमीच बदलत जातात. जुन्या प्रश्नांच्या ठिकाणी नवे प्रश्न येतात. कित्येकदा जुन्या-नव्यामध्ये सामाजिक संघर्ष आढळतो. हा सामाजिक स्थित्यंतराचा भाग आहे. अशा सामाजिक स्थित्यंतराचा प्रभाव साहित्यावर सतत होत जातो. किंबहुना समाजाचेच साहित्यात प्रतिबिंब उमटत असते, म्हणूनच साहित्यही प्रवाहीच होत असलेले आपण अनुभवतो.

साहित्य, समाज आणि मानवी जीवन यांच्यात एक प्रकारचा गूढ अनुबंध आहे. साहित्यिक ज्या परिसरात राहतो, ज्या वातावरणात वाढतो, त्याच्यावर ज्या प्रकारचे सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक स्वरूपांचे संस्कार होतात ते संस्कारच त्याला विचारप्रवण बनवतात, चिंतनशील करतात. ते चिंतनच साहित्यिकाला अंतर्मुख बनवून उत्तम प्रकारची कलाकृती निर्माण करण्यास कारण ठरते. त्या कलाकृतीतूनच त्याच्या अवती-भवतीचे वातावरण, त्यात आढळणारे मानवी जीवन आणि त्या जीवनाचा अधिकारवाणीने शोध घेण्याचा त्याने केलेला प्रयत्न आपणाला दिसतो. याच्यातूनच मानवी जीवनाचे अस्सल दर्शन घडत असते. वास्तव पातळीवर होत असलेल्या अशा प्रकारच्या मानवी जीवन दर्शनासाठी त्याला सापडलेले कथानक आणि वापरलेली भाषा माणूस आणि जीवन. माणूस आणि नियती यांच्या दरम्यानचे सहजासहजी न उकलणारे कोडे वाचकाला उकलून देत जाते.

साहित्यात कथा, कविता, नाटक या वाङ्मय प्रकारापेक्षा ' कादंबरी ' हा वाङ्मयप्रकार लोकप्रियतेच्या बाबतीत खूप अग्रेसर आहे वास्तव पातळीवर रंजक आणि काल्पनिक कथानकाच्या आधारे मानवी जीवनातील सत्यासत्यतेचे विस्तृत चित्रण करण्याचे कादंबरीत खूप सामर्थ्य आहे. कादंबरी वाचकांशी सुसंवाद साधत त्या जीवनाचे सखोल व सत्य दर्शनच घडवत असते. म्हणूनच मानवी जीवनात ज्याप्रमाणे वैचित्र्य आणि विविधता आढळते त्याप्रमाणेच कादंबरीचे स्वरूप देखील आहे.

रंजनप्रधान, पौराणिक, ऐतिहासिक, वास्तव, चरित्रात्मक, प्रादेशिक, समूहदर्शन घडवणारी अशा अनेक रूपातून कादंबरी अवतरली आहे, हे खरे. पण ' कादंबरी ' म्हणजे नेमके काय ? तर गद्यातून लिहिलेल्या मोठया आकाराच्या कथानकास साधारणपणे ' कादंबरी ' असे म्हटले जाते. इंग्रजीतील *'Novel'* या शब्दाला ' कादंबरी ' हा प्रतिशब्द मराठीत योजलेला आहे. सुरवातीच्या काळात ( एकोणीसाव्या शतकात ) नावल, नवलिका अशी नावे सुचविण्यात आली होती परंतु बाण या संस्कृत पंडिताने लिहिलेल्या आणि काल्पनिक कथानकाने युक्त अशा ' कादंबरी ' या विस्तृत गद्य कथेचे नावच आता या वाङ्मय प्रकारास रूढ झाले आहे [1]

गद्यात विस्ताराने खूप वाढणारी, एखाद्या गोष्टीसारखीच वाटत जाणारी ' कादंबरी ' ही नेमक्या व्याख्येत बसवणे जरा कठीण काम आहे. कादंबरी लिहिताना लेखनाचा आपला उद्देश साध्य करत वाचकांची उत्कंठा कायम ठेवण्यासाठी सत्य आणि कल्पना सौंदर्यावर लेखकाला आपले लक्ष केंद्रित करावे लागते. रचना कौशल्याच्या जोरावर भाषेचा सहज वापर करत व्यक्तीचे अंतरंग उलगडून दाखवावे लागते. \सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून, काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व कांही अंशी तदवलंबित जीवित घटना यांचे गोष्टरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग [2]/ अशी व्याख्या केली आहे. काल्पनिक प्रतिसृष्टी नसेल तर कादंबरीतील सरळ निवेदन हे वाचकाची उत्कंठा वाढवू शकणार नाही. ती वाढवण्यासाठी कादंबरीत कथानक, उपकथानक यांची कौशल्याने संगती लावत वास्तव न विसरता लिहिल्यास वाचताना वाचकास कुतूहल वाटत जाते आणि लेखकाचा उद्देश साध्य होण्यास मदत होते.

मानवी जीवनातील वैविध्यपूर्ण वैशिष्टय त्याच्या जीवनानुभवाशी निगडित आहे. त्या जीवनानुभवाचे स्वरूप स्थल, काल, व्यक्तीसापेक्ष बदलत जाते त्या त्या ठिकाणच्या सामाजिक, धार्मिक पद्धतीचा प्रभाव ही त्या त्या ठिकाणच्या व्यक्ती, व्यक्तिसमूहावर पडत असतो. लेखकाने याचा सूक्ष्म जाणीवपूर्वक विचार करणे गरजेचे असते. त्याच्या भावजाणिवेला ते पटणेही आवश्यक असते. कारण प्रत्येक लेखक आपल्या संवेदना क्षमतेनुसार जीवन दर्शन घडवत असतो. /अनुभवाची जात आणि लेखकावर असलेले विविध संस्कार यातून आदर्शवादी, वास्तववादी अथवा उपरोधपूर्ण साहित्य जन्माला येते.[3]/

कोणताही लेखक साहित्य निर्मिती करत असताना, कादंबरी लिहित असताना आपल्या मनाशी काहीतरी निश्चित ठरवूनच लिहित असतो. वाचकाला काहीतरी देण्याची त्याची अंत:करणापासून तळमळ असते. म्हणूनच लिहित असताना स्वत:च्या अनुभवाबरोबर तर्कापेक्षा काही विचार देखील

त्याच्याकडून नकळत प्रदर्शित होतात. पण कोणत्याही उत्तम साहित्यकृतीच्या पाठीमागे लेखकाचा कोणता अर्थपूर्ण जीवनानुभव आहे ? त्याने जे व्यक्त केले आहे त्याच्या पाठीमागचे त्याचे चिंतन त्याने किती अंतर्मुख होऊन केलेले आहे हे पाहणे महत्वपूर्ण असते. कारण त्याच्यावरच त्याच्या त्या कादंबरीचे मूल्य अवलंबून असते. आशयसंपन्न प्रत्ययकारी कादंबरी निर्माण होण्यासाठी खरे तर ते आवश्यकच आहे. " स्वतंत्र अनुभवाचे चित्रण केले तर त्यामुळे वाड्.मयाला काही आशय निश्चित प्राप्त होतो. जे तर्काला आणि शास्त्राला अशक्य वाटते ते कलेच्या यक्षभूमीत घडून येते. अर्थातच या आशयाची व्याप्ती व त्याचे मूल्य लेखकाच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून असते. [4] कादंबरीतून किंवा कोणत्याही कलाकृतीतून प्रकट झालेल्या विषय किंवा अनुभवालाच आशय म्हणून ओळखले जाते. हा आशय अभिव्यक्त होत असतानाच विचार महत्वाचा असतो. म्हणूनच ललित वाड्.मयात तर्काला स्थान नसले तरी विचाराला महत्व नाही, ही कल्पना मनाला पटण्यासारखी नाही. कोणताही लेखक अस्सल साहित्यकृती निर्माण करत असताना अंतर्मुख होऊन चिंतनशील वृत्तीने आपल्या जीवनानुभवांना अनेक घटना प्रसंगातून योग्य आकार देत असतो. ते करत असताना वास्तवाच्या पातळीवर घेतलेले कथानक, उपकथानक कदाचित काल्पनिक असेल पण त्याच्यातून माणसाच्या जीवनाचे घडणारे दर्शन हे सत्य असते. " कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्याद्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललितगद्य कथा म्हणजे कादंबरी. कादंबरी कुठल्याही विषयावर लिहिलेली असली तरी अखेर ती मानवी जीवनाचेच चित्र असते. आणि हे चित्र ज्या प्रमाणात जीवनाचं व्यापक आणि सखोल दर्शन घडवील त्या प्रमाणात ती कादंबरी श्रेष्ठ ठरेल [5] म्हणूनच कादंबरीला मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी कथा असे म्हटले आहे.

तसे पाहिले तर मराठी कादंबरीचा इतिहास हा फार जुना नाही. बाबा पद्मनजी यांनी 1857 मध्ये लिहिलेली ' यमुना पर्यटन ' ही मराठीतील पहिली कादंबरी मानली जाते. विधवांच्या दु:खाचे अगदी सरळ वर्णन करणा-या या कादंबरीने त्या वेळच्या सामाजिक स्थितीचे चित्रण करायचा प्रयत्न केला आहे. यानंतर चार वर्षांनी 1861 ला लक्ष्मणशास्त्री हळबे यांची ' मुक्तामाला ' ही अद्भुतरम्य कादंबरी प्रसिद्ध झाली. रंजनप्रियतेच्या जोरावर या कादंबरीने जनमानसात प्रिय होण्याचा प्रयत्न केला, आणि नंतर तब्बल दहा वर्षांनी 1871 मध्ये रा. भि. गुंजीकरांची ' मोचनगड ' ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाली. अगदी सुरूवातीच्या काळातील या तीन प्रवृत्ती प्रवाहांच्या कादंब-या महत्वाच्या आहेत.

कादंबरीला ' वास्तव ' बनवण्याचा प्रयत्न पुढे ह. ना. आपटे यांनी केला. त्यांच्या सामाजिक आणि ऐतिहासिक कादंब-या साहित्यात स्वत:चे अधिराज्य गाजविणा-या ठरल्या. त्याच्यानंतर वा. म.

जोशींसारख्या कादंबरीकाराने हा कादंबरीचा प्रवाह पुढे नेला आणि याच दरम्यान श्री. व्यं. केतकरांच्या सामाजिक प्रश्नाशी संबंधित कादंब-या समाजमान्य झाल्या.

यापुढील मराठी कादंबरीचे युग म्हणजे फडके, खांडेकर, माडखोलकरांचे युग. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र मराठी कादंबरीच्या प्रेरणाच बदलत चालल्या आहेत. माणसाच्या जगण्याच्या पद्धतीतच आमूलाग्र बदल होऊ लागले आणि कादंबरीचे विषयही बदलत गेले. बदलत्या अनेकविध अनुभवांचे दर्शन मराठी कादंबरीत घडू लागले आहे. ती आपल्या रूपस्वरूपानुसार अनेक अंत:प्रवाहानी वाहत आहे.

× स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील अंत:प्रवाह ×

स्वातंत्र्यानंतरच्या मराठी कादंबरीकडे सहज लक्ष दिले तर आपणाला कादँबरी वाङ्.मय प्रकारात अनेक वेगवेगळे प्रवाह आढळतात. 1950 च्या पुढे मराठी कादंबरी अनेक अंगांनी वाढली. वेगवेगळी वळणे घेत विकसित झाली. वैचारिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्तरावर या कादंबरीची निश्चित बैठक तयार झाली. मात्र विशिष्ट कादंबरी प्रवाहाचे नेतृत्व करू शकेल असा एखादा कादंबरीकार आपणाला आज दिसत नाही. किंवा कोणत्याही कादंबरीकाराचा कादंबरीच्या विशिष्ट प्रवृत्तीप्रवाहावर स्वत:चा ठसा उमटलेला दिसत नाही. अशा या अनेक प्रवाहांनी वाहणा-या कादंबरीचा थोडक्यात आढावा घेता येईल.

1) रंजनप्रधान :

भावनांचे केवळ प्रचारकी प्रदर्शन करणारी ही कादंबरी जीवनातील वास्तव विसरून हळुवार स्वप्नात रमणारी आहे. रंजन हेच साहित्याचे ध्येय मानून कादंबरी कल्पनासृष्टीत नेऊन ठेवणारे ना. सी. फडके हेच या प्रवाहाचे प्रमुख दिसतात. त्यांनी सुखवस्तू प्रेमी युगुलांचे दर्शन आपल्या अनेक कादंब-यांतून घडवले आहे. मानवतावादाचा पुरस्कार करणारी वि. स. खांडेकरांची कादंबरीही याच काळातील आहे. भाबडया श्रद्धेतून लिहिलेली त्यांची कादंबरीही रंजनप्रधानच बनली आहे. परंपरेची नाळ आपल्या कोणत्याच कादंबरीत त्यांनी तोडलेली नाही.

2) वास्तवाभिमुख :

जीवनातील वास्तव हे मानवी मनाला अधिक भावणारे आहे. म्हणूनच लेखक जीवनातील सत्य घटनांचे अंतर्मुख होऊन चिंतन करतो. काही घटनांचे व्यवस्थित संकलन करून त्यात एक प्रकारचे संगतीसूत्र शोधतो आणि त्याच्यातूनच वास्तवाभिमुख स्वरूपाच्या कादंबरीची निर्मिती करतो. अशा प्रकारची ही कादंबरी जीवनातील पारंपरिक मूल्ये व रूढ आदर्शांचा अंगीकार करते. धग, पाचोळा, शिदोरी या अशाच प्रकारच्या कादंब-या आहेत.

3) ऐतिहासिक / पौराणिक :

इतिहासकालीन एकप्रकारचा आखीव, रेखीव आकार देऊन एखाद्या ऐतिहासिक व्यक्तिमत्वावर लेखक कादंबरी लिहितो. बहुदा व्यक्तीच्या स्वभावाचे उदात्तीकरणच तो करत असतो. कारण ऐतिहासिक महत्वाची एखादी व्यक्ती मध्यवर्ती ठेवूनच ती कादंबरी लिहिलेली असते. स्वामी, झेप, शेहेनशहा, श्रीमानयोगी यांसारख्या कादंब-या प्रामुख्याने रंजनमूल्ये घेऊनच लिहिल्या आहेत.

इतिहासाबरोबरच पुराणकथेतील पौराणिक व्यक्तींना नायकत्व देऊन, खूप कष्ट घेऊन तांत्रिक व भाषिक योजना कुशलतेने करून अनेक लेखकांनी कादंब-या लिहिल्या. ययाती, मृत्युंजय, राधेय, कर्णायन यांसारख्या त्या लोकप्रिय कादंब-या होय.

4) चरित्रात्मक / आत्मचरित्रात्मक :

ऐतिहासिक व पौराणिक कादंबरीवरील साहित्यिक प्रतिक्रिया म्हणूनच चरित्रात्मक / आत्मचरित्रात्मक कादंब-यांचा उल्लेख करावा लागतो. या कादंबरीतील व्यक्ती फक्त अर्वाचीन काळातील असल्यामुळे कोणत्याही घटनेचा विपर्यस्त वापर करून चालत नाही. कल्पकतेच्या मोहाला बळी पडून वास्तवाशी विसंगत लेखन करता येत नाही. 1) हरिनारायण - भीमराव कुलकर्णी 2) आनंदी गोपाळ - श्री. ज. जोशी 3) दुर्दम्य - गंगाधर गाडगीळ 4) यज्ञ - भा. द. खेर 5) साहेब - उद्धव शेळके इत्यादी त्या कादंब-या आहेत.

5) समूहदर्शनात्मक :

स्वातंत्र्योत्तर काळात शहरातील मध्यमवर्गीय समाज आणि तळागाळातील लोकांना ग्रासणा-या अनेकविध समस्या निर्माण झाल्या. परिस्थितीशी झगडत मनस्वीपणाने जगणारी सर्वसामान्य अज्ञानी माणसे जीवनाशीच एकप्रकारचा संघर्ष करणारी होती. सहज पाहणा-याला विकृत वाटणारे, सर्वसामान्य माणसांचे जीवन हे सहज व प्रकृतीसुलभच होते. त्या जीवनाचे वस्तुनिष्ठ व वास्तवपातळीवर लेखन करणारे साहित्य या दरम्यान निर्माण झाले. मनाच्या भावनिक गुंतागुंतीपेक्षा माणसांचे साधे व सरळ जगणे शब्दबद्ध केल्यानंतर ते वाचकांत किती धक्कादायक असते हे जाणवते. चक्र, माहीमची खाडी, वासुनाका, माणूस, वस्ती वाढते आहे, बळी, फकीरा यांसारख्या त्या कादंब-या. या कादंब-यांतून माणसाचे सामूहिक जीवनातील, बिनधास्त, बेदरकार, वासना, विकृती इत्यादीमधून सरळ जीवनदर्शन घडते. याच दरम्यान कोसला, बिढार, झूल, वैतागवाडी, बॅरिस्टर अनिरूद्ध धोपेश्वरकर इत्यादी कादंब-या निर्माण झाल्या. मनातील नैराश्य, जीवनातील अर्थशून्यता, भ्रमनिरास दाखविणा-या या महत्वपूर्ण कादंब-या

आहेत. याच दरम्यान आत्मभानातून निर्माण झालेला दलित साहित्याचा प्रवाहही आपणाला आढळतो.

6) प्रादेशिक :

स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीत उल्लेखनीय ठरलेला एक महत्वपूर्ण कादंबरीतील प्रवाह म्हणजे ' प्रादेशिक कादंबरी '. मराठीतील अनेक मान्यवर लेखकांनी प्रदेश सापेक्ष वास्तव आणि जीवनदर्शी चित्र आपल्या कादंब-यातून चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रादेशिकतेत येणारा ' प्रदेश ' हा शब्दच मुळात भौगोलिक स्थाननिश्चितीचा निदर्शक आहे. खानदेशी, व-हाडी, कोकणी अशा प्रकारच्या विशिष्ट प्रादेशिक भू भागातील व्यक्ती, समाज, तेथील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वातावरण, पारंपरिक, रीतिरिवाज भाषा आणि ती प्रकट करण्याची विशिष्ट पद्धती अशा प्रकारच्या कादंब-यांतून प्रकट होत जाते. एक प्रकारे त्या त्या प्रदेशातील मानवी जीवन वैशिष्टयच मांडले जाते. बहुधा अशी कादंबरी सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगानेच लिहिली गेली असते. त्यामुळे त्या प्रदेशातील अस्सल सामाजिकताच त्या कादंबरीतून प्रकट होते.

व-हाडी, खानदेशी भाषिक प्रदेशाबरोबरच गोमंतकाच्या निसर्गसंपन्न पार्श्वभूमीवरील काही कसदार कादंब-या मराठीत आल्या आहेत. कोकणचे लोक म्हणजे लैंगिक अनाचारात मग्न झालेले, व्यभिचाराशिवाय तेथे काहीच आढळत नाही, असा एक समज आढळतो. निसर्ग वैभवाची देणगी मिळालेल्या दुधामधाच्या या प्रदेशातील लोकजीवन दारिद्र्याच्या सुबत्तेत खितपत पडलेले आहे. भुके कंगाल लोक अतिशय गरिबीत जगतात. पोटाला पोटभर ' पेज ' मिळावी म्हणून दुस-यांची ' शेज ' सजविणा-या येथील स्त्रियांच्या भावना होरपळत जातात. धर्म, रूढी, परंपरेच्या अंधश्रद्धेत अडकलेले येथील मानवी जीवन हे पूर्णपणे अगतिक बनून गेलेले दिसते. या पातळीवरच ' गोमंतका जागा हो ', ' ' देवकी ', ' भावीण ', ' महानंदा ' यांसारख्या लिहिल्या गेलेल्या कादंब-या या प्रादेशिक पातळीवरचे वास्तव जीवन दर्शन घडवतात. म्हणूनच त्यांना सामाजिकतेचे परिमाण प्राप्त झालेले आहे.

अशा प्रादेशिक कादंब-या पूर्णपणे बोली भाषेचा वापर करून लिहिल्या तर वाचकांना त्या कळतीलच असे नाही. वाचकांना काही प्रादेशिक शब्द समजण्यात अडचण येईल. म्हणूनच कादंबरीतील वातावरण निर्मितीसाठी प्रादेशिक बोलीचा वापर करून इतर लेखन प्रमाण भाषेत करण्याची पद्धत आता रूढ झाली आहे. म्हणूनच या कादंब-या आज स्वतःचे वेगळे वैशिष्टय जपून आहेत.

7) नव्या जाणिवा :

स्वातंत्र्यपूर्व काळातील त्याग, निष्ठा, देशप्रेमाचा साहित्यावर झालेला परिणाम काळाच्या ओघात पुसट होत गेला. बदलते सामाजिक संदर्भ, अर्थयंत्रणा, समाजसंस्था, राजकीय डावपेच याचा परिणाम नव्या जाणिवा घेऊन आलेल्या लेखकांवर होऊ लागला. हा लेखक भूतकाळातून घेतलेल्या प्रेरणेपेक्षा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वर्तमानकाळातील नव्या जाणिवांना सामोरा जावू लागला आहे. रंगनाथ पठारे, आनंद पाटील, राजन गवस, विश्वास पाटील यांसारखे आश्वासक आणि सक्षम साहित्यिक आता नव्या जाणिवा घेऊन लेखन करीत आहेत. या सर्व लेखकांचा आणि त्यांच्या साहित्याचा अर्थ म्हणजे त्यांनी सुरू केलेल्या मानवी जीवनाच्या अंतिम अर्थाचा शोधच होय.

× मराठी कादंबरीतील स्त्री समस्येचा वेध ×

कोणताही लेखक समाजातीलच एक व्यक्ती असते. त्याचे व्यक्तिगत अनुभव हे तो जगत असतो त्या समाजातील सामाजिक वातावरणाशी निगडित असतात. साहजिकच लेखकाचे अनुभव सामाजिक पातळीवर उतरतात. मग लेखक जगत असतो तो समाज कोणत्याही स्थल-कालाच्या पातळीवरचा असला तरी त्याच्याकडून निर्माण झालेली साहित्यकृती ही ख-या अर्थाने ' सामाजिकच ' असते. कारण तो ज्या वातावरणात जगत असतो त्या वातावरणातील परिस्थितीचे संस्कार त्याच्या मनावर होत असतात. या संस्कारातून लेखकाची जीवनविषयक दृष्टी बनत जाते. मनात सामाजिक जाणीव निर्माण होते. या सर्व परिस्थितीचा परिणाम त्याच्या लेखनातून खोलवर उतरत जातो आणि अस्सल सामाजिक साहित्यकृती निर्माण होते. कारण लेखक ज्या काळात जगत असतो तो काळ आणि त्या काळातील रूढार्थाने अस्तित्वात असलेल्या संस्कृतीचे एक पारंपरिक मूल्य असते. या मूल्याचा प्रभाव साहित्यिकाच्या मनावर होत असतो. म्हणूनच साहित्यिक मग तो कादंबरीकार असो अथवा कथाकार. समाजात परंपरागत चालत आलेल्या रूढी, काही रीतिरिवाजांच्या चौकटीचा व्यापक अर्थाने शोध घेतो. मानवी जीवनातील अनेक प्रश्नांचा सहानुभूतीपूर्वक तो वेध घेतो. समाजातील सर्वच स्तरावर म्हणजे आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक बाबतीत एक निश्चित विचार करून माणसाच्या मनातील संघर्ष, जीवननाटय तो टिपतो आणि एखाद्या महत्वपूर्ण साहित्यकृतीला तो जन्म देतो. समाजातील एखादी प्रचलित रूढ, एखाद्या कुटुंबातील धार्मिक परंपरा, अशा परंपरेशी निगडित असणारा समाज, त्या समाजात निर्माण होणारा एखादा सामाजिक प्रश्न आणि त्या प्रश्नातून निर्माण झालेले दुःख जेव्हा कादंबरीकार शब्दबद्ध करतो तेव्हा ती कादंबरी ' सामाजिक ' तेचे परिमाण घेऊनच जन्मते. अशा कादंबरीचा नायक किंवा नायिका ही त्या कुटुंबापुरतीच मर्यादित राहून दुःखाशी झगडत नाही तर ती

त्या दु:खाने सामाजिक प्रश्नाशी निगडित असलेल्या समाजाचीच प्रतिनिधी ठरते. कधीकधीतर ती समाजालाच एखाद्या प्रचलित वाईट प्रश्नाविरूद्ध संघर्षसिद्ध बनायला सांगते.

या पातळीवर मराठी कादंबरीकारांनी स्त्री आणि परिस्थिती, स्त्री आणि रूढी-परंपरा, स्त्री आणि सामाजिक आचार-विचार या बाबत विचारपूर्वक कष्टप्रद लेखन केल्याचे प्रामुख्याने दिसते. मराठी कादंबरीची सुरवातच खरे तर ' स्त्री-समस्ये'चा वेध घेणारी ठरली आहे. कादंबरीच्या विकासाबरोबरच महाराष्ट्रीयन स्त्रियांचा विकासही झाल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर ' स्त्री ' समस्येचा वेध घेणा-या मराठी कादंबरीचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे : -

' यमुना पर्यटन ' ही बाबा पद्मनजी यांची पहिली कादंबरी. ती मराठीतील पहिली कादंबरी समजली जाते. तत्कालीन हिंदू धर्मातील विधवा स्त्रियांचे दु:ख कोणत्या प्रकारचे होते याचेच वास्तव चित्रण त्यांनी केले आहे. 1857 ला लिहिलेली ही कादंबरी खरोखरच महत्वाची आहे. या पाठोपाठच हळबेशास्त्री यांनी ' पुनर्विवाहाचा प्रश्न ' आपल्या कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला. ' रत्नप्रभा ' ही त्यांची कादंबरी यादृष्टीने पाहण्यासारखी आहे. या नंतर मात्र मराठी कादंबरीत लक्षणीय बदल जाणवतो. कादंबरीतून स्त्री मुक्तीच्या दिशेने टाकलेले पहिले पाउल आढळते ते ह. ना. आपटे यांच्या ' पण लक्षात कोण घेतो ' या कादंबरीत. गतिमान वास्तवामुळे बदललेल्या स्त्री जीवनाचे चित्र हरिभाऊंच्या ' पण लक्षात कोण घेतो ' ने पुढे आले. स्त्री ही स्वतंत्र व्यक्ती आहे. सभोवती घडणा-या आणि स्वत:च्या जीवनाशी संबंधित असलेल्या घटनांविषयी स्त्रीच्या काही भवनात्मक प्रतिक्रिया असू शकतात. या प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा अधिकार समाजाने ' स्त्री ' ला नाकारला असला तरी अंतर्मनात काही विश्लेषणात्मक नोंदी स्त्री करत असते ही जाणीव ' पण लक्षात कोण घेतो ' मध्ये ठळकपणे उमटली. [6]

वामन मल्हार जोशी यांची ' आश्रम हरिणी - 1915, रागिणी - 1916 ला प्रसिद्ध झाली. त्या पाठोपाठ नलिनी - 1920, सुशीलेचा देव - 1930, इंदु काळे सरला भोळे - 1935 ला प्रसिद्ध झाली. वामन मल्हारांनी मराठी कादंबरीतील 'स्त्री' ला खूप परिमाणे दिली. नवी पर्यायी व्यवस्था उभी राहिलेली नसताना जुन्या व्यवस्थेला धक्के मारणे समाजहिताच्या दृष्टीने घातक आहे, हा विचार वामन मल्हारांच्या लेखनामागे होता. [7] मात्र यापेक्षा श्री. व्यं. केतकरांचे लेखन हे अधिक चिंतनशील वृत्तीने खोलात जाऊन व समाजशास्त्रीय बैठकीला धरून झाले. ब्राहमणकन्या - 1930 या कादंबरीतून सुधारणा - स्वीकारून, तत्वनिष्ठेने जगणा-या सरळ स्वभावाच्या माणसांचे जगणे किती वाईट होते हे दिसते. मिश्र विवाहातून जन्माला आलेल्या स्त्रियांचे विदारक भवितव्य त्यांनी मांडले आहे. गोंडवनातील प्रियंवदा - 1926, या कादंबरीत स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य, लैंगिक कोंडमारा त्यांनी चित्रित

केला आहे. तर ' परागंदा ' या कादंबरीत वेश्या संततीचे दुःख कशा प्रकारचे असते याचे दर्शन त्यांनी घडवले आहे. केतकरांनी वैचारिक उंचीने केलेले हे लेखन प्रस्थापित काळाच्या फारच पुढे गेले होते.

यानंतर युगप्रवर्तक फडक्यांची स्वप्नाळू वृत्तीने स्वीकारलेली आधुनिकता ही पूर्ण पोषाखी ठरली. वातावरणातल्या इंद्रधनुष्याप्रमाणे भुवया कोरलेली त्यांच्या कादंबरीतील प्रेमोत्सुक स्त्री वातावरणातल्या इंद्रधनुष्याप्रमाणे कादंबरीतच विरून गेली. रंजक ठरली. मात्र खांडेकरांच्या रंजकच पण मानवतावादी नायिका ध्येयवादी, करारी, गरीब-श्रीमंत, सद्गुणी रंगल्या आहेत. याच दरम्यान माडखोलकरांनी ' भंगलेले देऊळ ' सारखी कादंबरी लिहून कामुकतेच्या पातळीवर उतरून शृंगार वर्णने लिहिली आहेत. नागकन्या, डाकबंगला, यासारख्या त्यांच्या कादंब-याही याच पातळीवरच्या आहेत. या टप्प्यातील या तीनही कादंबरीकारांनी स्त्रियांच्या समस्येचा वेध घेतला नाही, पण कालाच्या ओघात नायिकांची बदलती परिमाणे स्वीकारली आहेत.

भा. वि. वरेरकरांच्या काही कादंब-या मात्र स्त्री समस्येचा वेध घेणा-या आहेत. त्यांच्या विधवा कुमारी, गोदू गोखले, कुलदैवत मधील स्त्रिया कर्तृत्ववान आहेत. तर विभावरीबाईंनी ' हिंदोळ्यावर या कादंबरीतून घटस्फोटीत आदर्श शिक्षिका अचलेच्या खंबीर मनात कोणकोणती वादळे निर्माण होतात याचे नेमके आणि नेटके दर्शन घडवले आहे. लेखिकेने अचलेची मातृत्वाची ओढ आणि लैंगिक समस्या खूप धाडसाने लिहिली आहे. ही कौतुकास्पद बाब आहे.

एकंदरीत पाहता ' वामन मल्हारांच्या कादंब-यांत स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा व्यापक, सामाजिक संदर्भ लक्षात ठेवून झालेली होती. केतकरांच्या कादंब-यांच्या संपूर्ण बाजच मुळी व्यक्तिगत समस्यांची सामाजिक मांडणी करण्याचा होता. या उलट फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या कादंब-यांत स्त्रियांचे प्रश्न व्यक्तिकेंद्री स्वरूपात मांडले गेले. समाजातील अनिष्ट प्रवृत्ती कोणत्या, त्यांच्या निर्मितीची कारणे कोणती, त्यांचे निराकरण कसे करता येईल हे शोधण्याची व्यापक चिंतनशील बैठक या कादंबरीकारांपाशी नव्हती. याला त्या काळातील सामाजिक परिस्थिती काही प्रमाणात कारणीभूत असण्याची शक्यता आहे.[8]

देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या आर्थिक व सामाजिक बदलाचे मराठी साहित्यावर फार मोठया प्रमाणावर परिणाम झाले आहेत. समाजातील व्यक्ती समोर आलेल्या नवनवीन आव्हानांबरोबरच सर्वांचेचे जीवन पूर्णपणे ढवळून निघाले आहे. सांस्कृतिक केंद्रे बदलत चालली. त्यामुळे मराठी कादंबरीत आता बदलते जीवन दर्शन प्रकर्षाने दिसू लागले आहे. हे जीवन सतत प्रवाही आणि नैतिक

जाणिवा ओलांडणारे आहे. या कादंबरीतून स्त्री जीवन दर्शन वेगवेगळया पातळीवरून रेखाटले गेले आहे. यापैकी स्त्री जीवनाशी जवळून संबंधित काही कादंब-या खालीलप्रमाणे :
गोमंतका जागा हो, देवकी, भावीण, महानंदा, जोगीण, झुलवा, डाळिंबाचे दाणे, चौंडक, भंडारभोग, इंधन, पाचोळा, धग, चक्र, अर्धांग, माहीमची खाडी, काचापाणी, यासारख्या अनेक कादंब-यांचा उल्लेख करता येईल. कमल देसाई, गौरी देशपांडे यांसारख्या लेखिकांनी स्त्री जीवनाचे पदर सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक पातळीवरून उलगडून दाखविले आहेत. ' काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई ', एकेक पान गळावया ', ' तेरूओ ' यांसारख्या त्यांच्या कादंब-या आहेत.

कालाच्या प्रवाहात बदलत जात असणा-या कादंबरीतील स्त्रियांचे भावदर्शनही पूर्णपणे बदलत आहे. समाजात सात्विक वृत्तीने जगणारी स्त्री, परिस्थितीच्या फे-यात सापडून जीवनाशी संघर्ष करणारी स्त्री, समर्पण वृत्तीने जगणारी स्त्री, वासना, विकृतीच्या दलदलीत फसलेली स्त्री, ध्येयवादी, आक्रमक स्त्री अशा प्रकारच्या अनेक स्त्रियांचे दर्शन आपणाला अनेक कादंब-यांतून दिसते. मात्र या कादंब-यांचा विचार करत असताना मराठी साहित्यात आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या पण सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या ठरणा-या 1) भावीण - बा. भ. बोरकर 2) महानंदा - जयवंत दळवी या गोमंतकाच्या पार्श्वभूमीवरील कादंब-या उल्लेखनीय आहेत. त्या त्यांच्या आंतरिक भावदर्शनामुळे महत्वाच्या वाटतात. अंधश्रद्धा आणि पारंपरिक रीतिरिवाज यामुळे मनात निर्माण झालेला तणाव या दोन्ही कादंब-यांतून चित्रित केला आहे. उपेक्षेच्या दु:खात अगतिकपणे जीवन जगणा-या स्त्रियांच्या अंतरंगाचा वेध घेण्याचा प्रयत्न दोन्हीही लेखकांनी केला आहे. या दोन्ही कादंब-यांत सामाजिकता, कोणत्या प्रकारे अवतरते ते पाहणे आणि त्यांच्या वाङ्मयीन गुणवत्तेचे मूल्यमापन करणे हा प्रस्तुत प्रबंधिकेचा उद्देश आहे. म्हणून कादंबरी, तिचे अंत:प्रवाह आणि मराठी कादंबरीतील स्त्री समस्येचा वेध हा थोडक्यात घेतलेला आढावा प्रतिपाद्य विषयाची पार्श्वभूमी म्हणून आवश्यक ठरतो.

## × संदर्भ ×


| | |
|---|---|
| 1) कुलकर्णी, भीमराव | ' कादंबरी : घटना व रचना ', ललित (जाने. 1972), पृ. 146. |
| 2) बापट प्र.वा., व गोडबोले ना.वा. | ' मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास ', आवृत्ती - 3, व्हीनस प्रकाशन पुणे, 1973, पृ. 37. |
| 3) घाटे, दीपक | ' आजची मराठी कादंबरी - 1975 ते 1985 ', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, (एप्रिल - जून 1987) पृ. 6. |
| 4) गाडगीळ, गंगाधर | ' खडक आणि पाणी ', आवृत्ती - 1, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1960, पृ. 7. |
| 5) कुलकर्णी, श्री. मा. | ' कादंबरीची रचना ', आवृत्ती - 1, उन्मेष प्रकाशन, नागपूर, 1956, पृ. 15. |
| 6) सोमण, अंजली | ' साहित्य आणि सामाजिक संदर्भ ', आवृत्ती - 1, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 1989, पृ. 76. |
| 7) तत्रैव | पृ. 87. |
| 8) तत्रैव | पृ. 93. |